# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४३/२००९ दिनांक :

प्रति,

निवास स्पिनींग मिल्स,
ब–२/२, एम.आय.डी.सी. अक्कलकोट रोड / अर्जदार
चिंचोळी, सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
सोलापूर

विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
शहर विभाग, सोलापूर

३) कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभाग, सोलापूर

**कोरम** :–१) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ०४.०८.२००९

सदरील प्रकरण या मंचाकडे दि. ४.७.२००९ रोजी दाखल झाले आहे. त्या सोबत अर्जदाराने संबंधित कागदपत्रे दाखल केलेली आहेत. संबंधित कागदपत्रामध्ये अर्जदाराने त्यांची वीज जोडणी क्र. (१) एचटी ३३०२४९००२६०६ (२) एचटी ३३०२४९००२७८० (३) एचटी ३३१५१९००४८९१ या संबंधात अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांच्याकडे परिशिष्ट क्ष नमुन्यात तक्रार अर्ज केलेला आहे. तो तक्रार अर्ज ग्राहकाने दि. ३.७.२००९ रोजी पाठविला असून अद्याप तो अंतर्गत कक्षाकडे न्यायप्रविष्ट आहे. सदरील अपिलामध्ये अर्जदाराने अंतर्गत कक्षामध्ये ज्या सुरक्षा ठेव रकमेबाबत तक्रार केलेली आहे व परत मिळण्याची मागणी केलेली आहे, त्या संबंधात प्रस्तुत अर्जामध्ये या मंचाकडे दाद मागितली आहे.

परिणामी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनियम ६:४ प्रमाणे अंतर्गत कक्षाकडे तक्रारदाराने दाखल केलेले प्रकरण अद्याप निकाली झालेले नाही अथवा दाखल झालेल्या तारखेपासून २ महिन्यांचा कलावधी संपलेला नाही. म्हणून या मंचास सदरच्या प्रकरणाबाबत गुणवत्तेवर विचार करता येणार नाही. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) प्रस्तुत अर्जास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनियम ६:४ ची बाधा येत असल्याने प्रकरण गुणवत्तेचा विचार न करता फेटाळणेत येत आहे.

२) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडील निर्णय झाल्यानंतर अथवा अंतर्गत कक्षाकडे तक्रार दाखल केलेल्या तारखेपासून २ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर प्रस्तुत अर्जदारास त्याच्या इच्छेप्रमाणे या मंचाकडे त्याच्या तक्रारीवर दाद मागता येईल.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( के. वाय. जगताप)
अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

दिनांक : ०४.०८.२००९

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव :

श्री. जी.सी. लेले, सदस्य :